**ठळक बातम्या**

- शेतकऱ्यांना मदतीसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांची दुष्काळस्थितीची पाहणी करण्यासाठी केलेल्या मराठवाडा दौऱ्यात ग्वाही

- आयुष्मान भारत योजनेमुळे वैद्यकीय उपचारांचा खर्च कमी होऊन मध्यमवर्गीयांना मोठा लाभ झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेशी संबंधित सर्व निर्णय निवडणूक आयोगानं एकमतानं घेतले असल्याचं आयोगाच्या अधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारोत्तोलनात मीराबाई चानूला ४९ किलो वजनी गटात रौप्य पदक, इतर खेळांमध्येही भारताची आगेकूच

**<><><><><>**

राज्यात दुष्काळसदृश स्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मराठवाड्याचा दौरा केला. मुख्यमंत्र्यांनी आज लातूर, धाराशिव जिल्ह्यात पावसाअभावी सुकून गेलेल्या पिकांची तसंच कोरड्या पडलेल्या साठवण तलावाची पाहणी केली. पिकांचे पंचनामे न करता सरसकट मदत करण्यासारखी परिस्थिती असल्यामुळे राज्य सरकार तात्काळ उपाययोजना करणार आहे. शासन दुष्काळाची पहिली अधिसूचना लवकरच प्रसिद्ध करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी आज दिली.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असल्याचंही ते म्हणाले. शेतकऱ्यांचं सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचं कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केलं असून, यापुढेही त्यांना वीज बिल भरावं लागणार नाही. तसंच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबवून शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला असून, या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असंही मुख्यमंत्री म्हणाले. अकोला जिल्ह्यात दुधलम इथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन पाहणी केली. शेतकऱ्यांनी भयभीत होऊ नये, सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाही

उपमुख्यमंत्र्यांनी दिली. नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज जिल्ह्यातल्या विविध भागात जाऊन दुष्काळसदृश्य स्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी विविध शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पिकांची सद्यस्थिती, पावसाचे प्रमाण, पाण्याची उपलब्धता तसेच संभाव्य नुकसानीबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेतली.

<><><><><>

राज्याच्या अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती असून सरकारनं दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी यासाठी आंदोलन केलं जात आहे.

**गडचिरोली** जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीनं आर्थिक मदत द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या गडचिरोली जिल्हा शाखेनं आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. पावसानं ओढ दिल्यानं धान, सोयाबीन, कापूस यासह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा किसान सभेनं केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत निवेदनही देण्यात आलं.

कोरडा दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी करत **यवतमाळ**मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आक्रोश मोर्चा काढला. मोर्चात आमदार नितीन देशमुख आणि आमदार संजय देरकर सहभागी झाले होते. पावसाअभावी पिकं हातून गेलेल्या शेतकऱ्यांना येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत मदत जाहीर करा, अन्यथा समृद्धी महामार्ग बंद पाडू, असा इशारा आमदार देशमुख यांनी दिला.

<><><><><>

मुंबई-एमएमआरमध्ये पुढच्या १५ ते २० वर्षांत ३० लाख घरं बांधणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केले. ठाणे महापालिकेच्या सिद्धेश्वर नगर आणि रमाबाई नगर क्लस्टर योजनेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

मुंबई ठाण्यासह मीरा-भाईंदर, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर शहरांमध्ये क्लस्टरला चालना देण्याचं सरकारचं धोरण असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. युनिफाइड डीसीपीआरमधील बदलांमुळे क्लस्टर आणि एसआरए प्रकल्पांना गती मिळाल्याचं त्यांनी सांगितले. ठाण्यातील ६ हजार कुटुंबांना सुरक्षित, दर्जेदार घरे देतानाच २३ नागरी सुविधा, रोजगाराच्या संधी आणि नियोजित टाऊनशिप उभारून नव्या ठाण्याचा पाया रचण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मेट्रो, अंतर्गत मेट्रो, कोस्टल रोड आणि ठाणे-बोरिवली बोगदा यांसारख्या प्रकल्पांमुळे ठाण्याच्या पायाभूत सुविधांना नवी दिशा मिळणार असल्याचे सांगत, क्लस्टरमधील इमारतीही दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण असाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

आयुष्मान भारत योजनेला आज आठ वर्षं पूर्ण झाली. या योजनेमुळे वैद्यकीय उपचारांवरचा खर्च खूप कमी झाला असून त्याचा लाभ गरीब आणि मध्यमवर्गीयांना होत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशानं आठ वर्षांपूर्वी ही योजना सुरू केल्याचं प्रधानमंत्र्यांनी संदेशात म्हटलं आहे. आजमितीला या योजनेअंतर्गत ६० कोटींहून अधिक लाभार्थींना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण दिलं आहे. पाच कोटींहून अधिक नागरिकांनी आयुष्मान आरोग्य मंदिरात येऊन सेवांचा लाभ घेतला आहे. यामुळे प्राथमिक आरोग्यसेवा अधिक मजबूत होण्यास मदत झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी संदेशात नमूद केलं आहे.

<><><><><>

भारत निवडणूक आयोग ही बहुसदस्यीय संवैधानिक संस्था आहे. आयोगाच्या निर्णयप्रकियेदरम्यान सदस्यांनी प्रश्न आणि शंका उपस्थित करणं, हा प्रमाणित कार्यपद्धतीचाच भाग आहे. मतदारांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा हेतू त्यामागे असतो. अंतिम निर्णय घेताना हे सर्व आक्षेप विचारात घेऊनच आयोग निर्णय घेतो असं आयोगाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनातून स्पष्ट केलं आहे. गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी १४ वेळा आयोगाच्या निर्णयांवर आक्षेप घेतला असल्याचं वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये आल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगानं हा खुलासा केला आहे.

देशभरात टप्प्याटप्प्यानं राबवल्या जात असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या प्रक्रियेअंतर्गत मतदार याद्यांच्या शुद्धीकरणादरम्यान निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी मतदार यादीतली नावं वगळणं तसंच मतदारांशी संबंधित माहितीसाठ्याच्या हाताळणीबाबत प्रश्न उपस्थित केले होते.

<><><><><>

जपानमधे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारोत्तोलनात भारताच्या मीराबाई चानू हीनं महिलांच्या ४९ किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावलं.

महिला नेमबाजीत भारताच्या महेश्वरी, परिणाझ धालीवाल आणि रायझा धिल्लन यांनी सांघिक स्कीट प्रकारात कांस्यपदक जिंकलं. नेमबाजीत मनू भाकरला महिलांच्या १० मीटर एअर पिस्तुल प्रकाराच्या अंतिम फेरीत पाचव्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

सॉफ्ट टेनिसच्या उपांत्य फेरीत भारताच्या जय मीना याला जपानच्या ताकुया याच्याकडून २-४ असा पराभव पत्करावा लागला, त्यामुळे त्याला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. या क्रीडाप्रकारातलं भारताचं हे पहिलंवहिलं पदक ठरलं आहे.

वुशू या क्रीडाप्रकारात आज महिलांच्या ६० किलो वजनी गटाच्या सांडा प्रकारात उपांत्य फेरीत भारताची रोशिबिना देवी इंडोनेशियाच्या थानिया कुसुमानिंगत्यास हिला २-० असं हरवून अंतिम फेरीत पोचली आहे.

नौकानयन स्पर्धेत रोइंगमध्ये बलराज पनवार यानं पुरुषांच्या एकेरी स्कल्स प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं ६ मिनिटं ५२ सेकंद ८४ मिनी सेकंद अशी वेळ नोंदवली.

बॅडमिंटनच्या उपान्त्य फेरीत चीननं भारतावर ३-१ अशी मात केल्यामुळे भारताला कांस्य पदकावर समाधान मानावं लागलं.

//<><><><><>//